नांदेड जिल्हयातील पर्यटन स्थळे व पर्यटन विकास:

एक भौगोलिक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
मानव्यविद्याशाखे अंतर्गत भूगोल विषयाच्या विद्यावाचस्पती
पीएच.डी. पदवीकरीता सादर करण्यात येणारा संशोधन आराखडा

संशोधक विद्यार्थी
कसबे प्रज्ञा भगवान
भूगोल विभाग
म.गांधी महाविद्यालय,अहमदपूर जि.लातूर

संशोधन मार्गदर्शक
प्रा.डॉ.गांधले.एच.ए.
बी.रघुनाथ महाविद्यालय,परभणी जि.परभणी

संशोधन केंद्र
भूगोल विभाग
म. गांधी महाविद्यालय अहमदपुर, जि. लातूर.

ऑगस्ट २०२३

नांदेड जिल्हयातील पर्यटन स्थळे व पर्यटन विकास:

एक भौगोलिक अभ्यास

प्रस्तावना:

पर्यटनाच्या घटनेने जवळपास संपूर्ण जगाला आकर्षित केले आहे. आर्थिक लाभ मिळविण्यासाठी, सामाजिक आणि सांस्कृतिक संबध वाढवण्यासाठी तसेच रोजगार निर्मितीसाठी हा उपक्रम सर्वात महत्त्वाचा आहे. स्थानिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर एक आशा दायक उद्योग म्हणून पर्यटनाला उज्वल भविष्य आहे. पर्यटन हे आर्थिक वाढीचे प्रमुख इंजन आणि परकीय चलन मिळवून देणारा एक महत्त्वाचे स्त्रोत आहे. पर्यटन केंद्राच्या विकासामध्ये भौतिक सांस्कृति आणि ऐतिहासिक घटक तसेच पायाभूत सुविधा महत्वाची भूमिका बजावतात.

२१ व्या शतकात सामाजिक व आंतरराष्ट्रीय स्तरावर दूरगामी परिणाम करणारी योगवाही आर्थिक क्रिया म्हणजे पर्यटन होय. प्रवास आणि पर्यटन हा जगातील अग्रेसर व्यवसाय असून पर्यटनामुळे जगातील जास्तीत जास्त लोकांना रोजगार प्राप्त होतो. पर्यटनामूळे प्रत्येक देशाला परकीय चलन मिळत असते. भिन्न विभिन्न समाजातील, देशातील लोकांचा संपर्क पर्यटनामुळे निर्माण होतो. राष्ट्रीय एकात्मतेस अत्यंत पोषक अशी वैचारिक देवाण-घेवाण पर्यटनामुळे होते. आंतरराष्ट्रीय सामजस्य वाढविण्यासाठी मदत होते.(घारपुरे,२००१) अशा प्रकारे पर्यटन ही आर्थिक क्रिया असून जगातील बहुतांशी लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यास महत्त्वाची भूमिका निभावत आहे. तसेच पर्यटनामुळे आंतरराष्ट्रीय सामजस्य निर्माण होत आहे.

भारताचा व्यापाक विस्तार, विविध क्षेत्रातील विविधता यामुळे जगामील प्रत्येक पर्यटकाला काहीना काही देण्याचही क्षमता या देशात आहे. येथील प्राचीन ऐतिहासीक वास्तुंचे सौंदर्य, येथील शास्त्रीय व लोकसंगीत, कला नृत्य यांची प्रदिर्घ परंपरा आहे. येथिल विविधरंगी पोषाख,बाजारातील विविध रंगाची गर्दी, यात्रा, मेळावे, जादुगर,

माकडवाले,अस्वल वाले, डोंबारी, वाघ्यामुरळी, वासूदेव, आदि आदिम जमाती, शांत सुंदर हिमच्छादित पर्वत शिखरे, असंख्य वन्य पशूपक्षी त्यातील गेंडा,वाघ,सिंह,हत्ती हे वैशिष्टयपूर्ण प्राणी आणि त्यांनी समृध्द असलेली राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये रूपेरी गोव्यातील वाळूचे किनारे, धार्मिक व ऐतिहासीक स्थळे, लेण्या, गडकिल्ले, इत्यादी जगभरातील पर्यटकांना साथ घालतात. म्हणूनच भारत देशाला 'पर्यटकाचे नंदनवन' असे म्हणतात.

महाराष्ट्र हे पर्यटनाच्या दृष्टीने विविध पर्वतरांगा, नयनरम्य समुद्रकिनारे, इतिहासाची साक्षदेणारे गडकिल्ले, धो-धो कोसळणारे धबधबे, गडकिल्ले, प्राचीन लेणी, धार्मिक तिर्थक्षेत्रे, समृध्द जैवविविधतेची प्रचिती देणारे अभरण्ये अशा एक ना अनेक आकर्षण स्थळे असे पर्यटन समृध्द राज्य आहे. महाराष्ट्र हे पर्यटकासाठी विविध प्रकारची पर्यटन स्थळे असणारे जगातील मोजक्या प्रदेशापैकी एक आहे. या राज्याला ७२० किलोमिटर लांबीचा समुद्रकिनारा हिरव्या कोकण किनारपटटीसह लाभलेला आहे. पश्चिम घाट आणि सहयाद्रीच्या पर्वत रांगामध्ये थंड हवेची ठिकाणे आहेत. महाराष्ट्राला समृध्द इतिहास, परंपरा आणि संस्कृतीचे वरदान लाभलेले आहे. येथिल जागतिक दर्जाचे प्राचीन किल्ले व स्मारके, प्राचीन गुफा मंदीरे आणि यात्रा स्थळे याला पुष्टी देतात.

मराठवाडा विभागातील नांदेड जिल्हयात नैसर्गिक, धार्मिक, सांस्कृतिक पर्यटन स्थळे आहेत. यामध्ये सचखंड साहेब गुरूद्वारा, काळेश्वर मंदिर, माळेगाव यात्रा स्थळ, सहस्त्रकुंड धबधबा, उणकेश्वर देवस्थान, रेणुकामाता मंदिर आणि कंधारचा भुईकोट किल्ला इत्यादी प्रसिध्द पर्यटन स्थळे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व स्थानिक पर्यटकांचे आकर्षणाचे केंद्र बनली आहेत. या पर्यटन केंद्राचा विकास झपाटयाने होतो आहे.

पर्यटन अर्थ:

पर्यटन या शब्दाना इंग्रजीमध्ये Tourism म्हणतात. Tourism हा शब्द Tour (प्रवास) या शब्दापासून बनला आहे.तर Tour (प्रवास) हा शब्द लॅटिन भाषेतील Tornos

या शब्दापासून बनला आहे. Tornos या शब्दाचे रुपांतर पुढे Tourism या शब्दात झाले या शब्दाचा अर्थ पर्यटन असा आहे.

पर्यटनाची व्याख्या:

१. साधारणपणे पर्यटन म्हणजे," एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करणे (आणि काही कालांतराने) कोणताही हेतू न ठेवता फक्त आनंद व मौजमजा लुटुन मूळ ठिकाणी परत येणे म्हणजे पर्यटन होय."

२. जागतिक पर्यटन संघटना: " एखादी व्यक्ती आपल्या वास्तवाच्या ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी कायमस्वरूपी वास्तव्य न करता काही कालावधीसाठी मनोरंजन, उद्योग व इतर कामासाठी प्रवास करुन पुन्हा: मूळ ठिकाणी परत येणे म्हणजे पर्यटन होय."

३. ब्रिटन पर्यटन संस्था: "पर्यटन म्हणजे व्यक्तींनी त्याच्या राहत्या स्थानापासुन विशिष्ट अंतरावर अस्थायी, अल्पकालीन केलेले मार्गभ्रमण होय, की जे संशोधन, व्यवसाय, मनोरंजन व ऐश आरामासाठी असते."

पर्यटनाचे महत्त्व:

आर्थिक विकासाकरीता पर्यटनाचा महत्त्वाचा संबध आहे. पर्यटन हे एक श्रम केंद्रीत सेवा उद्योग आहे. जो पर्यटक वस्तू व सेवा प्रदान करुन पर्यटक खर्चातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष उत्पन्न मिळवू शकतो. परकीय चलन मिळविण्याचे पर्यटन हे एक शक्तीशाली साधन आहे.पर्यटनाच्या विकासामुळे वाहतूक, निवास, दुरसंचार, रस्ते, विमानतळे, पाणी आणि विज इत्यादी चांगल्या पायाभुत सुविधा उपल्ब्ध होतात. पर्यटन केंद्राच्या प्रचारासाठी सरकार व खाजगी सहभाग सर्वात आवश्यक पायाभुत सुविधा विकसित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. पर्यटनाचे आणखी एक महत्व म्हणजे प्रादेशिक विकास देशातील अविकसीत प्रदेशांना पर्यटन विकासाचा मोठा फायदा होऊ शकतो. प्रादेशिक पर्यटन स्थळे विकसीत केले तर स्थानिक लाकांची भरभराट होऊ शकते रोजगार आणि उत्पन्नातील प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी या प्रदेशातील पर्यटन विकास महत्त्वपुर्ण घटक बनू शकतो.

पर्यटन भूगोलाचे महत्त्व:

पर्यटन भूगोल हा प्रवास आणि पर्यटन, एक उद्योग आणि सामाजिक आणि सांस्कृतीक क्रीया कलाप म्हणून अभ्यास आहे. पर्यटनाच्या भूगोलामध्ये पर्यटनाचा पर्यावरणीय प्रभाव, पर्यटन आणि मनोरंजनाच्या अर्थव्यवस्थेचे भौगोलिक क्षेत्र,पर्यटन उद्योग आणि व्यवस्थापनाच्या समस्या आणि पर्यटनाचे समाजशास्त्र आणि पर्यटनाची ठिकाणे यांचा समावेश होतो.

पर्यटन हा मानवाच्या अत्याधुनिक आर्थिक व्यवसाय असून तो फार झपाटयाने विकासित होत आहे. पर्यटन व्यवसाय ज्या पर्यावनणाशी संबंधित आहे ते पर्यावरण, त्यातील बदल, मानवाचे आर्थिक व्यव्हार व साधनसंपत्ती, त्यांचे स्थळ व काळ संदर्भातील अध्ययन ज्या भूगोलशास्त्रात केले जाते त्या भूगोलाच्या व पर्यटनाचा अत्यंत जवळचा संबंध आहे. पर्यटन भूगोल शास्त्रात पर्यावरणाचे स्वरुप, मानवी वस्ती, संस्कृती, ऐतिहासीक स्थळे इत्यादी भौगोलिक वितरण व या घटकांचे परस्परसंबंधाचे अध्यन केले जाते. पर्यटनामध्ये पर्यटकांच्या आवडीचे स्थाने, अश्या स्थानांच्या दरम्यान होणारे पर्यटकांचे स्थानांतर इत्यादी अपेक्षित असल्याने पर्यटन व्यवसायात भौगोलिक परिस्थीतीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

महाराष्ट्रातील प्राकृतीक रचना, हवामान, जंगले, वन्यप्राणी, पशूपक्षी, जलाशय, सरोवर तसेच ऐतहासीक, सांस्कृतीक व धार्मिक घटक पर्यटन विकासाच्या घटकास अनुकूल ठरले आहेत. त्यामुळेच पर्यटन भूगोलाला महत्व प्राप्त झाले आहे.

अभ्यासक्षेत्र व विषयाची निवड:

तपासाधीन अभ्यासक्षेत्र व विषयाची निवड अनेक विचारांनी प्रभावीत होते. नांदेड जिल्हा दक्षिण महाराष्ट्राच्या पठारावर वसला असून मराठवाडयातील आठ जिल्हयापैकी हा एक महत्त्वाचा जिल्हा आहे. जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिणपूर्व सीमेला दक्षिणोत्तर पसरलेला असुन १८° १५' ते १९° ५५' उत्तर अक्षाशं व ७७° ७ ते ७८° १५' पूर्व रेखाशं मध्ये स्थिर आहे. नांदेड जिल्हा विशेषत: धार्मिक व ऐतिहासीक पर्यटनासाठी जगप्रसिध्द

आहे, कारण जिल्हयात सचखंड साहेब गुरुद्वारा व कंधारचा किल्ला ही दोन पर्यटन स्थळे महत्त्वाची आहेत. याशिवाय जिल्हयात इतर सहस्त्रकुंड धबधबा, रेणुकामाता मंदिर, मालेगाव यात्रा स्थळ, काळेश्वर व नैसर्गिक, धार्मिक महत्त्वाची पर्यटन केंद्रे पर्यटकांना आकर्षित करतात.

वर नमुद केलेल्या पर्यटन स्थळांचे महत्त्व लक्षात घेऊन प्रस्तुत संशोधन विषय " नांदेड जिल्हयातील पर्यटन स्थळे व पर्यटन विकास : एक भौगोलिक अभ्यास " हा विषय निवडला आहे. या विषयाच्या निवडीचे हे महत्त्वाचे घटक प्रभावी ठरातील ते पुढीलप्रमाणे.

१.२१ व्या शतकात अभ्यास क्षेत्रात पर्यट वाढ व विकासामुळे पर्यटकांच्या संख्येत झपाटयाने वाढ होत आहे.

२. अभ्यास क्षेत्रातील ऐतिहासीक, धार्मिक, आणि नैसर्गिक पर्यटन स्थळे पर्यटकासाठी आकर्षणाचे केंद्र बनलेले आहे.

३. राष्ट्रीय, राज्यमहामार्ग, रेल्वे, हवाई वाहतुक यामुळे अभ्यास क्षेत्रात वाहतुकीच्या साधनामध्ये पर्यटनाची विकासाची गतिशिलता वाढली आहे.

४. अभ्यास क्षेत्रात पर्यटकासाठी निवास व इतर, पायाभूत सुविधेत वाढ होत आहे.

संशोधनाचे महत्त्व:

प्रस्तुत संशोधन विषयाचे महत्त्व पुढील प्रमाणे सांगता येईल.

१. अभ्यास क्षेत्रातील पर्यटन स्थळांची माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे आहे.

२. नांदेड जिल्हयातील पर्यटनाच्या सोयी-सुविधांचा आढावा घेऊन त्यातील असलेल्या उणिवा दुर करण्यासाठी हे संशोधन उपयुक्त ठरेल.

३. शासकीय व निमशासकीय स्तरावर पर्यटन धोरण आणण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे ठरेल.

४. नांदेड जिल्हयातील पर्यटन स्थळांचा विकास करुन उद्योग व्यवसायाला चालना मिळेल व रोजगाराच्या संधी प्राप्त करण्यासाठी या संशोधनाला महत्त्व आहे.

५. पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी रचनात्त्मक व सुत्रबध्द अभ्यास करण्यासाठी उपयोग होईल.

संशोधनाची उदिष्टे:

नांदेड जिल्हयातील पर्यटन स्थळे व पर्यटन विकासाचा अभ्यास करण्यासाठी पुढील उदिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. अभ्यास क्षेत्रातील प्राकृतिक व सामाजिक घटकअभ्यासणे.

२. नांदेड जिल्हयातील पर्यटन स्थळांचा वर्गीकरणात्त्मक अभ्यास करणे.

३. पर्यटन स्थळांच्या ठिकाणाच्या निवासव्यवस्था, भोजनव्यवस्था, वाहतुक सुविधा व अन्य पायाभुत सुविधांच्या विकासाचा अभ्यास करणे.

४. अभ्यास क्षेत्रातील पर्यटन स्थळांचा सामाजिक व आर्थिक घटकावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.

५. पर्यटन स्थळांच्या सुविधा निहाय पर्यटनाचा विकास अभ्यासणे.

६. पर्यटनाच्या सुविधा निहाय विकासातून रोजगार निर्मितीचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके:

१. नांदेड जिल्हयातील पर्यटन स्थळांत पर्यटकांच्या संख्येबरोबर सेवा-सुविधेत वाढ होत आहे.

२. पर्यटनाच्या विकासासाठी सेवा-सुविधा व सामाजिक- आर्थिक घटक जबाबदार असतात.

३. पर्यटन विकासासाठी नियोजन व धोरण कारणीभुत ठरते.

संशोधन पध्दती:

प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक व दुय्यम साधनावर आधारित राहील.

१. **प्राथमिक साधने** : यात मुलाखत, प्रश्नावली, सर्वेक्षण इत्यादी पध्दतीचा उपयोग करुन अभ्यास क्षेत्रातील पर्यटन स्थळांना भेटी देवुन माहिती गोळा केली जाईल.

२. दुय्यम साधने: यात जनगनणा अहवाल (२००१ ते २०११), सामाजिक आर्थिक घोषवारा, विषयाशी संबंधीत प्रकाशित पुस्तके, अप्रकाशित शोधप्रबंध, प्रकाशित शोधनिबंध, मासिके, पर्यटनाचा शासकीय अहवाल इत्यादींचा उपयोग करण्यात येईल.

३. भौगोलिक तंत्रे: पर्यटन केंद्रावरील संकलित आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी विविध सांख्यिकीय पध्दतीचा, सुत्राचा, नकाशे व आलेख यांचा तसेच जी.आय.एस (GIS), जी.पी.एस.(GPS), गुगल अर्थ आणि एम एस ऐक्सेल इत्यादी संगणक सॉक्टवेअरचा उपयोग करण्यात येईल.

संशोधन पध्दती

प्राथमिक साधने	**दुय्यम साधने**	**भौगोलिक तंत्रे**
भेटी	पुस्तके	नकाशे
सर्वेक्षण	शोधनिबंध	आलेख
प्रश्नावली	शोधप्रबंध	जी. आय एस
	जनगणना अहवाल (२००१-२०११)	जी.पी.एस
मुलाखती	पर्यटनाचा शासकीय अहवाल	गुगल अर्थ
	मासिके, वर्तमानपत्रे	एम एस ऐक्सेल
	सामाजिक, आर्थिक घोषवारा	संगणक
		सॉक्टवेअर

संशोधनाची मर्यादा:

प्रस्तुत संशोधन कार्य महाराष्ट्र राज्यातील नांदेड जिल्हयापुरते मर्यादित असुन या मर्यादित संशोधन कार्यात जिल्हयातील पर्यटन स्थळांच्या मुख्य अभ्यासाचे विश्लेषण आणि त्यांच्या विकासाचा समावेश आहे. साधारण: पर्यटन विकासाचा आढावा घेताना २००१-२००२ ते २०२१ -२२ हा कालावधी निश्चित केलेला आहे.

पुर्व संशोधन साहित्याचा आढावा:

प्रस्तुत संशोधन आराखडा तयार करण्यासाठी काही पुर्व साहित्याचे अवलोकन केले आहे ते पुढीलप्रमाणे.

घारापुरे विठ्ठल (२००१) : यांनी पर्यटन भूगोल या त्याच्या पुस्तकाला पर्यटन भूगोल परिचय, पर्यटनाचे घटक, पर्यटनाचे परिणाम, पर्यटनाचे प्रकार, भारत व महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे व विकास इ. घटकाचे वर्णन केले आहे.

शिंदे, एस. पी. (२००६) : यांनी 'पर्यटन भूगोल' या पुस्तकात पर्यटन भूगोलाचे स्वरुप व व्याप्ती, पर्यटन विकासाचे घटक, पर्यटनाचे वर्गीकरण तसेच भारतातील पर्यटन व्यवसाय इ. घटकांची सविस्तरपणे मांडणी केली आहे.

खतीब, ऐ.के. (२००६) : यांनी ' पर्यटन भूगोलात' पर्यटनाचे प्रकार, समस्या व भारतातील धार्मिक सांस्कृतीक पर्यटनाविषयी सविस्तर लेखन केले आहे.

शुक्ला राजेश व शुक्ला रश्मि (२००९) : यांनी 'पर्यटन भूगोल' या पुस्तकात पर्यटन भूगोल ओळख, प्रकार, महत्व, पर्यटनाचे विविध अंगे व पर्यटन विकास इ. व भारतासारख्या विकसनशिल देशात जिथे सांस्कृतीक भौगोलिक विविध हवामान हे पर्यटकांना आकर्षित करते म्हणून याचा आनंद घेण्यासाठी इतर देशातून पर्यटक येतात. वर्णन केले आहे.

होटा, बिस्वनाथ (२००२): पर्यटन आणि पुरीच्या आर्थिक, सामाजिक-सांस्कृतीक पर्यावरणावरील प्रभाव : पर्यटन भूगोलातील एक अभ्यास या अप्रकाशित पीएच.डी प्रबंधात

पुरी पर्यटन केंद्राच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतीक आणि पर्यावरणीय पैलुंचा अभ्यास केला आहे.

शिंदे, सुनिता एस (२००२) : यांनी ' बीड जिल्हयातील पर्यटन स्थळांचा भौगोलिक अभ्यास या' पीएच.डी. च्या संशोधनात बीड जिल्हयातील पर्यटन स्थळे धार्मिक, भौगोलिक, ऐतिहासीक दृष्टय प्रसिध्द असुन मराठवाडा विभागाच्या विकासासाठी या पर्यटन स्थळांचा उपयोग केल्यास रोजगार संधी वाढतील व अभ्यास क्षेत्राचा विकास होण्यास वाव मिळेल असे नमूद केले आहे.

राजपंगे, माधव गणपती (२०१०) : यांनी ' मराठवाडयातील पर्यटन स्थळांचा विकास आणि भवितव्य - एक अभ्यास' या पीएच.डी. संशोधनात मराठवाडा हा ऐतिहासीक धार्मिक व सांस्कृतीक पर्यटन स्थळांनी समृध्द आहे तसचे पर्यटनासाठी सुविधा व पर्यटन विकासाच्या समस्या संबंधी सविस्तर वर्णन केले आहे.

लिंकन झकेरिया (२०१३): यांनी त्यांच्या प्रकाशित लेखात बांगलादेशातील पर्यटनाच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतीक प्रभावाचे विश्लेषण केले आहे. त्यात पर्य टकांची चर्चा, त्यांचा भेटीचा उदेश: आर्थिक योगदान वाढ आणि रोजगारात योगदान इ. घटक अभ्यासले आहेत.

मुदासीर माजिद मालिक आणि आसिमा नुसरथ (२०१४): यांनी 'भारतातील पर्यटन विकासाचा आढावा' या प्रकाशित लेखात १९९७ ते २०१२ या कालावधीत भारतात येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत होणारे बदल, आर्थिक वाढ आणि पर्यटन विकासाचे विश्लेषण केलेआहे.

शिंदे सुनिता शंकरराव व शिंदे दत्ता राधाकिशन (२०१८) : यांनी 'परभणी जिल्हयातील पर्यटन स्थळांच्या भौगोलिक अभ्यास' या प्रकाशित लेखात जिल्हयाला पर्यटनाच्या दृष्टीने वैभवशाली वारसा लाभला आहे. जिल्हयातील प्राकृतिक, ऐतीहासीक, धार्मिक व सांस्कृतिक पर्यटन केंद्र असुन या पर्यटनाच्या विकासाला भरपुर वाव आहे. म्हणुन त्यांनी

जिल्हयातील त्रिधारा, जाभुळ बेट, सय्यद शाह नुराख उलहक दर्गा, श्री लक्ष्मी नर्सिंग पोखर्णी व येलदरी धरण इत्यादी पर्यटन स्थळांचा अभ्यास केलेला दिसुन येतो.

प्रकरणाची मांडणी:

प्रस्तुत संशोधन कार्य एकुण सहा प्रकरणात विभागण्यात येणार असुन त्यांची खालीलप्रमाणे प्रकरण निहाय मांडणी करण्यात आलेली आहे.

प्रकरण पहिले: प्रस्तावना

पहिल्या प्रकरणात विषयाशी निगडीत प्रस्तावना, पर्यटन अर्थ व व्याख्या पर्यटनाचे महत्त्व, पर्यटनाची वैशिष्टये, भारतातील पर्यटन विकास, महाराष्ट्रातील पर्यटन विकास क्षेत्र व विषय निवड, संशोधनाचे महत्त्व संशोधनाची उदिष्टे, गृहितके, संशोधन पध्दती, संशोधनची मर्यादा, पूर्व संशोधन साहित्य आणि प्रकरणाची मांडणी इत्यादी घटकाचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण दुसरे : अभ्यास क्षेत्रातील प्राकृतिक व सामाजिक घटक

दुसऱ्या प्रकरणात प्राकृतीक घटकात स्थान व विस्तार, प्राकृतीक रचना, नदीप्रणाली, हवामान, मृदा व वनस्पती तर सामाजिक घटकात लोकसंख्या वितरण, वाढ, ग्रामिण-शहरी लोकसंख्या, घनता, लिंगरचना, साक्षरता, कृषी, जलसिंचन सुविधा आणि वाहतुक व दळणवळण सुविधा घटक अभ्यासले जाणार आहेत.

प्रकरण तिसरे : नांदेड जिल्हयातील पर्यटन स्थळांचे वर्गीकरण

प्रस्तुत प्रकारणात अभ्यास क्षेत्रातील ऐतिहासीक, धार्मिक, व नैसर्गिक अशा सचखंड साहेब गुरुद्वारा, काळेश्वर मंदिर, माळेगाव यात्रा स्थळ, सहस्त्रकुंड धबधबा, उणकेश्वर देवस्थान, रेणुका मातामंदिर,आणि कंधारचा किल्ला इत्यादी पर्यटन स्थळांची सविस्तर माहिती गोळा करुन त्याचे वर्गीकरण दर्शविण्यात येईल.

प्रकरण चौथे : पायाभुत सोयी-सुविधा आणि पर्यटनाचा विकास

प्रकरण चौथ्यात पायाभुत सोयी सुविध आणि पर्यटनाचा विकास यांचा समावेश आहे.

अ] पायाभुत सेवा सुविधा

अभ्यास क्षेत्रातील पर्यटन स्थळांच्या सोयी-सुविधा निहाय पर्यटनाचा विकास दर्शविण्यात येईल.(उदा. वाहतुक, भोजन, निवास वगैरे सुविधाद्वारे)

ब] पर्यटन समाधान निर्देशांक

अभ्यास क्षेत्रातील पर्यटन केंद्राच्या ठिकाणची सोयी-सुविधा, पर्यटन स्थळाबाबतचे मत लक्षात घेऊन पर्यटन समाधान निर्देशांक काढण्यात येईल.

प्रकरण पाचवे: पर्यटनाचा विकास आणि रोजगार निर्मिती

अभ्यास क्षेत्रातील पर्यटन स्थळांच्या ठिकाणी पर्यटकांना तिथे पोहचण्यासाठी वाहतूक सुविधा,निवास,भोजन,रेस्टॉरंट,इत्यादी सोयी सुविधा उपलब्ध केल्याने पर्यटनाचा विकास होईल.त्यातून जिल्हयास रोजगाराची निर्मिती होण्यास वाव मिळेल. उदा. निवासस्थान व्यवस्थापक,आचारी,कापड धुणे व स्वच्छता कामगार,मद्यपानगृहाचे कामगार, मार्गदर्शक, वाहतूक कामगार इत्यादी नोकऱ्या निर्मिण होतील.

प्रकरण सहावे : निष्कर्ष, समस्या व उपाय

प्रकरण सहाव्यात नांदेड जिल्हयातील पर्यटन स्थळांचा सविस्तर अभ्यास करुन तथ्यात्मक निष्कर्ष काढुन काही समस्या व उपाय सुचविण्यात येतील.

संदर्भ सुची:

१. Asture, S.B. (2018) : Satisfaction Index: A Study in Toursim Geography, Aayushi International Interdisciplniary Research Journal, Vol- v, Issue-x,p-18.

२. घारपुरे विठठल (२००१) : पर्यटन भूगोल, पिंपळापुरे ॲण्ड कं.पब्लिशर्स, नागपुर, पृ.२.

३. शिंदे एस. बी. (२००६) पर्यटन भुगोल, फडके प्रकाशन कोल्हापुर, पृ. ११७.

४.महारष्ट्र शासन (२०२१) : लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुबंई, पृ.१२.

५.महारष्ट्र शासन (२०१६):महाराष्ट्र पर्यटन धोरण, पर्यटन व सांस्कृतीक कार्य विभाग मुंबई,पृ.२,३.

६. महारष्ट्र शासन (२०२२): जिल्हा सामाजिक व आर्थिक समालेचन,नांदेड जिल्हा, अर्थ व सांख्यिकी विभाग,मुबंई.

७. शिंदे सुनिता शंकरराव आणि शिंदे दत्ता राधाकिशन (२०१८) : परभणी जिल्हयातील पर्यटन स्थळांचा भौगोलिक अभ्यास, Aayushi International Interdisciplanary Research Journal,Vol-V,Isssue-IX, p- 147.

८. सुर्यवंशी ज्ञानेश्वर शिवाजी राव (२००८) : पर्यटन भूगोल, प्रतिम पब्लिकेशन,जळगाव,पृ.७.

९. Gade, Dilip Akram (2015) : Geographical Study of Presenrt Status and Tourism Potential in Kolhapur District, Unpublished Ph.D. Thesis, Solapaur University, p 65

१०. Sara Gholani, Hossain Assayesh and Abbas Alipour-Nakhi (2010) : The Study of Tourism Geography in Rural Areas of Noushar city of Mazandaram Province (Iran) - the Case of Balade kojour vill, Amnerican- Eurasianj, Agrice & Environ. Sci

११. खतिब के.ए. (२००६) : पर्यटन भूगोल, फडके प्रकाशन, कोल्हापुर.

१२. शुक्ला राजेश व शुक्ला रश्मि (२००९): पर्यटन भूगोल, अर्जुन पब्लिकेशन, नई दिल्ली.

१३. राजपंगे,माधव गणपती (२०१०): मराठवाडयातील पर्यटन स्थळांचा विकास आणि भवितव्य एक भौगोलिक अभ्यास, अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद..

१४.Hota Biswnath (2002): Tourism and Cts Impacts on the Economic, Socio-Cultural and Environment Set up of Puri: A Study in Geography of Tourism, Unpublished Ph.D.Thesis, Utkal University, Bhubaneshar.

१५. Lincoln, Zkeria (2013): Socio- Economic and Cultural Impact of Tourism in Bangladesh, European Scienfice Journals, Vol.2.

१६. Mudasir, Majid Malik and Asima Nusrath (2014): A Review of Tourisim Development in India, Golden Research throughts, vol.3 .Issue-11 .

संशोधक विद्यार्थी

कसबे प्रज्ञा भगवान
भूगोल विभाग
म.गांधी महाविद्यालय अहमदपुर,
जि. लातूर.

संशोधन मार्गदर्शक

प्रा.डॉ.गांधले.एच.ए.
बी.रघुनाथ महाविद्यालय,परभणी